दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २२८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१८ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## एपीएमसी फळ बाजारात भीषण आग

### १० गाळे आगीमध्ये जळून खाक

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

**नवी मुंबईतील वाशीजवळील एपीएमसी फळ मार्केटला आग लागल्याची घटना गुरुवारी (दि. १७) दुपारच्या सुमारास घडली. बाजारातील फळांच्या पॅकिंगसाठी लागणाऱ्या लाकडी पेट्या, कागदी पुठ्ठा आणि खोके विक्री करणाऱ्या गोडाऊनला दुपारी चारच्या सुमारास घडलेल्या या सुमारे १० गाळे आगीच्या भक्ष्य स्थानी पडले असल्याची माहिती मिळत आहे. आगीत १८ ते २० व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. नवी मुंबई अग्निशामक दलाच्या चार गाड्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. संध्याकाळी उशिरापर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले.**



वाशीतील एपीएमसी बाजारात फळ मार्केटच्या आवारात अनधिकृतपणे फळांना पॅकिंग करण्यासाठी कागदी पुठ्ठा, लाकडी पेट्या, प्लास्टिकचे कॅरेट विक्री करणारी दुकाने आहेत. आज गुरुवारी दुपारच्या सुमारास एन-९६४ या गाड्यांचे पाठीमागे असणाऱ्या एका गोडाऊनला अचानक पणे आग लागली. या ठिकाणी असणारे कागदी लगद्याने पेट घेतल्यानंतर ही आग अधिक वाढत जात नजीकच्या लाकडी पेट्या ठेवण्यात आलेल्या दुकानांना देखील लागली. त्यानंतर याआधीने एक एक करून इतर दुकाने आपल्या विळख्यात घेतले. लाकडी आणि कागदी साहित्य त्याचप्रमाणे प्लास्टिकचे साहित्य गोण्या असल्याने आगीने काही वेळातच गाळ्यांना घेतले.

या ठिकाणी असणाऱ्या व्यवसायिकांनी कागदी आणि पुठ्ठे बाजूला काढण्याचे काम सुरू केले, त्यानंतर घटनास्थळी वाशी अग्निशामक दलाच्या जवानांनी पाचारण करून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु आगीचा वेग वाढतच गेल्याने इतर तीन गाड्या घटनास्थळी बोलवण्यात आल्या. त्यानंतर तीन तासांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकार्यांनी दिली. या की प्राथमिक माहितीनुसार चार गाळे पूर्णपणे भस्मसात पडले आहे तर इतर १० गाळ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या आगीमध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. फळ मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. फळे पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक लाकडी पेट्या आणि पुठ्ठ्याचे डबे पसरलेले आहेत, त्यामुळे धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. घाऊक बाजारातील अशा अतिक्रमणांना आळा घालण्यात अपयशी ठरल्याबद्दल अग्निशमन विभागाने एपीएमसी प्रशासन आणि तुर्भे वॉर्ड अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला पाहिजे, असे मागणी आरटीआय कार्यकर्ते अनरजित चौहान यांनी केली आहे.

## शिवसेनाप्रमुखांच्या नावाचा बाजार मांडू नका : उद्धव ठाकरे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थवर जात बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन केलंय. यावेळी त्यांच्यासोबत रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरेही यावेळी उपस्थित आहेत.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आज स्मृती दिन आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कालच बाळासाहेबांच्या स्मृती स्थळावर येऊन त्यांना अभिवादन केलं. आम्हीच बाळासाहेबांच्या विचाराचे खरे वारसदार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. त्यावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मात्र, मुख्यमंत्र्यांवर टीका केली आहे. काही लोकांना शिवसेनाप्रमुख कोण हे बाळासाहेबांच्या नंतर समजायला दहा वर्ष लागली, असा चिमटा काढतानाच शिवसेनाप्रमुखांच्या नावाने बाजार मांडू नका, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

बाळासाहेबांचा आजचा स्मृतीदिन मला वेगळा वाटतो. त्याला कारण आहे. कारण काही जणांना दहा वर्ष लागली शिवसेनाप्रमुखांनंतर शिवसेना प्रमुख कोण हे समजायला. अनेक शिवसेना प्रेमी आहेत. शिवसेना प्रमुख प्रेमी आहेत. त्यांनी सुद्धा त्यांचं प्रेम आणि भावना व्यक्त करायला हरकत नाहीये. पण ते व्यक्त करताना त्याचा बाजार होऊ नये ही भावना आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

बाजारूपणा कशातही दिसता कामा नये. कारण विचार व्यक्त करायला कृती असावी लागते. कृतीतूनही विचार व्यक्त होतात. कृती नसेल तर तो विचार विचार राहत नाही. तो बाजार राहतो. म्हणून शिवसेना प्रमुखांच्या नावाचा बाजार कुणी मांडू नये. त्यांच्या भावना, श्रद्धा, प्रेम समजू शकतो. पण तुम्ही साजेसं काम करा, असा टोला त्यांनी लगावला.

शिवसेना प्रमुखांचा आज दहावा स्मृती दिन आहे. ते केवळ शिवसेना प्रमुख नव्हते. त्यांच्यात अनेक पैलू होते. त्याचा अनुभव घडवणारा जिवंत अनुभव स्मारकात पाहता येणार आहे. शिवसेनाप्रमुख म्हटलं तर संघर्ष आलाच. या संघर्षाचं अर्क चित्रं या प्रदर्शनात पाहायला मिळत आहे, असंही त्यांनी सांगितलं. भाजपला संपूर्ण देशाचा ताबा हवा आहे.

तिथे या स्मारकाचं काय? त्यांना सर्वच आपल्या बुडाखाली घ्यायचं आहे, अशी खोचक टीकाही त्यांनी केली. तसेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सावरकरांबद्दल केलेल्या विधानाशी आम्ही सहमत नाही, असं सांगतानाच आम्हाला सावरकरांबद्दल नितांत आदर आणि प्रेम आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. पंतप्रधानांना भारतरत्न पुरस्कार देण्याचे सर्वाधिकार असतात. मग तुम्ही सत्तेत येऊन ८ वर्ष झाली. सावरकरांना भारतरत्न का दिला नाही? असा सवाल त्यांनी केला.

## रूग्णांची इत्थंभूत माहितीसाठी महापलिकेचे सॉफ्टवेअर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापलिकेने एक सॉफ्टवेअर सुरू केले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत प्रयोगशाळा (पॅथालॉजी लॅब), प्रयोगशाळा कलेक्शन सेंटर, हॉस्पिटल प्रयोगशाळा या संस्थांनी सदर सॉफ्टवेअरवर रुग्णांची माहिती सादर करावयाची आहे. जेणेकरून महानगरपालिका क्षेत्रातआजरांच्या वाढत्या प्रादुर्भावाबाबत इत्थंभूत (ठशरश्र ढळाश) माहिती प्रशासनाला मिळेल. नोंदणीकृत संस्थांना हे साफ्टवेअर महापालिकेच्यावतीने विनाशुल्क पुरविण्यात येईल. याकरिता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत प्रयोगशाळा (पॅथालॉजी लॅब), प्रयोगशाळा कलेक्शन सेंटर, हॉस्पिटल प्रयोगशाळा या सस्थांनी पनवेल महानगरपालिकेकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत हॉस्पिटल, प्रयोगशाळा, कलेक्शन सेंटर यांचेकडून डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, लेप्टो स्पायारोसिस, येलोफिव्हर, फायलेरियासीस, टायफॉईड, फिव्हर, स्वाईन फ्लू , अतिसार, कावीळ, झिका व्हायरस अशा संसर्गजन्य आजाराच्या रुग्णांची माहिती महानगरपालिकेस प्राप्त होत नसल्याने अशा आजाराचा प्रादुर्भाव रोखणेकामी, खबरदारी व उपाययोजना करण्याच्या कामात महानगरपालिकेस अडचणी येत आहेत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याची व त्यांच्या आरोग्याची जपणूक करण्याचे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. त्याकरिता पालिका क्षेत्रातील कार्यरत प्रयोगशाळा, प्रयोगशाळा कलेक्शन सेंटर, हॉस्पिटल प्रयोगशाळा या सस्थांनी पनवेल महानगरपालिकेकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. अशी माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली आहे.

पनवेल महानगरपालिकेकडे नोंदणी न करणाऱ्या संस्थाना महापालिकेमार्फत अनधिकृत संस्था म्हणून घोषित करण्यात येईल, व त्यांना महापालिका क्षेत्रात व्यवसाय करण्यास मज्जाव करण्यात येईल. तसेच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. महापालिका क्षेत्रातील सर्व खाजगी प्रयोगशाळा प्रयोगशाळा कलेक्शन सेंटर, हॉस्पिटल प्रयोगशाळा यांनी पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडे दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विनाशुल्क नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे,असे प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनी सूचित केले आहे.



## गृहनिर्माण संस्थांनी मानीव अभिहस्तांतरण करणे अत्यंत गरजेचे : डॉ. सोपान शिंदे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इमारत गृहनिर्माण संस्थेची तर जागा मालकीसुद्धा गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची असायला हवी, त्यामुळे सर्व गृहनिर्माण संस्थांनी संबधित भूखंडाचे मानीव अभिहस्तांतरण करणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांनी येथे केले.



१४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत सहकार सप्ताह साजरा केला जातो. त्या अनुषंगाने केशवस्मृती नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल यांच्या वतीने शहरातील गोखले सभागृहात 'ग्राहक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.शिंदे बोलत होते.

डॉ. सोपान शिंदे यांनी पुढे म्हंटले कि, कायदेशीर पद्धतीने गृहनिर्माण संस्था उभी असलेली जागा गृहनिर्माण संस्थेच्या नावावर होण्याच्या प्रक्रियेला 'मानीव अभिहस्तांतरण' अर्थात डीम्ड कन्व्हेअन्स म्हणतात. मानीव अभिहस्तांतरण झाल्याशिवाय गृहनिर्माण संस्थाकडे त्या जागेचा मालकी हक्क येऊ शकत नाही. त्याशिवाय पुनर्विकास होणे तर अशक्यच आहे, त्यामुळे मानीव अभिहस्तांतरण झाल्यानंतरच गृहनिर्माण संस्थेचा भविष्यातला पुनर्विकास होऊ शकतो. त्यामुळे ही प्रक्रिया किती महत्वपूर्ण आहे, हे प्रत्येकाने समजून घेणे आवश्यक आहे. मानीव अभिहस्तांतरण प्रक्रियेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करण्याचा निर्णय गृहनिर्माण विभागाने घेतला आहे आणि यामुळे मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया सोपी आणि सुटसुटीत झाली आहे. त्यामुळे वेळेतच मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करून गृहनिर्माण संस्था सुरक्षित करून घ्यावी, असेही डॉ. शिंदे यांनी मार्गदर्शन करताना अधोरेखित केले.

यावेळी रायगड जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष व ऍड. जे. टी. पाटील यांनी, 'पतसंस्था व बँकांमधील गुंतवणूक, वारस नोंदी व मृत्युपत्राचे महत्व' या विषयांवर तर पनवेल सहाय्यक निबंधक बालाजी वाघमारे यांनी 'इमारतींचा पुनर्विकास' या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी केशवस्मृती नागरी सहकारी पतपेढीचे अध्यक्ष अमित ओझे, उपाध्यक्षा ज्योती कानिटकर, रायगड जिल्हा फेडरेशनचे संचालक के.एस. पाटील, प्रकाश चांदीवडेकर, रोहा सहाय्यक निबंधक तुषार लाटणे, पेन सहाय्यक निबंधक शीतल महाले, तसेच ठेवीदार, सभासद, हितचिंतक, नागरिक, अन्य संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैजनाथ देवस्थान जमीन गैरव्यवहार प्रकरणी माहिती घेण्यासाठी किरीट सोमय्या कर्जत तहसील कार्यालयात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील वैजनाथ देवस्थानच्या जमिनीची धर्मादाय आयुक्तांच्या परवानगी शिवाय विक्री केल्याप्रकरणी माहिती घेण्यासाठी भाजपा नेते किरीट सोमय्या कर्जत तहसीलदार कार्यालयात आले होते. त्यांनी तहशीलदारांशी या विषयावर चर्चा केली.

किरीट सोमय्या एका विवाहासाठी कर्जतला आले होते. त्यानंतर ते भाजपा तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, किसान सेलचे सुनील गोगटे, जिल्हा चिटणीस दीपक बेहेरे, किरण ठाकरे,संजय कराळे, प्रमोद पाटील, स्नेहा गोगटे, बिराज पाटकर आदींच्या समवेत तहसील कार्यालयात येऊन तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांची भेट घेऊन चर्चा केली.

यावेळी पत्रकारांशी बोलताना किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी बोलताना, ''कर्जत तालुक्यातील वैजनाथ देवस्थानच्याव जमिनीची विक्री धर्मादाय आयुक्तांच्या परवानगी शिवाय अनेक वेळा झाली. हा ठाकरे सरकारच्या काळात हे गैरव्यवहाराचे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मेहुणे श्रीधर पाटणकर यांनीही ती जमीन घेतल्याचे निदर्शनात आले आहे. मात्र अचानक तेथे कुणीतरी सलीम बिलाखीया आला. याबाबतीत मी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनाही भेटणार आहे. याबाबतची माहिती घेण्यासाठी मी तहसीलदार शीतल रसाळ यांची भेट घेतली. असे स्पष्ट केले.



## राष्ट्रीय खो-खो स्पर्धेतील सुवर्ण कामगिरीबद्दल आ.प्रशांत ठाकूर यांनी केले साहिल जाधवचे कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंजाब येथे संपन्न झालेल्या स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन इंडिया राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्रास सुवर्ण पदक मिळवून देत महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या तसेच स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आलेल्या याचबरोबर आपल्या अप्रतिम कामगिरीच्या बळावर ज्याची नुकतीच भारतीय खो-खो संघात निवड करण्यात आलेल्या रोहा तालुक्यातील पोफळघर संघाचा स्टार खेळाडू महाराष्ट्र संघाचा उपकर्णधार साहिल संतोष जाधव याचे



भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी भरभरून कौतुक केले.यावेळी दक्षिण रायगड सरचिटणीस मिलिंद पाटील, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे,ॲड. संतोष पवार, प्रमोद गोळे आदी उपस्थित होते.

.../२

## उरणमध्ये ग्रामपंचायत निवडणूकी संदर्भात महाविकास आघाडीचे बैठक सत्र सुरू

उरण : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात ग्रामपंचायत निवडणूकांचे बिगुल वाजले असून या निवडणूकीत उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. शासन निर्णयानुसार उरण तालुक्यातील नविनशेवा, बोकडविरा, घारापुरी, पाणजे, डोंगरी,जसखार, करळ, पागोटे, नवघर, भेंडखळ धुतुम, चिर्ले,पुनाडे, वशेणी, सारडे, पिरकोन कळबूसरे व रानसई या १८ ग्रामपंचायतीच्या निवडणूक १८ डिसेंबर २०२२ रोजी होणार आहेत.ग्रामपंचायतींच्या निवडणूकीला तसेच प्रचाराला अवधी कमी असल्याने उरण तालुक्यातील गावा गावात आता बैठका सुरू झाल्या आहेत. काही बैठका औपचारिक व काही बैठका अनौपचारिक ही घेतल्या गेल्या आहेत.

ग्रामपंचायत निवडणूक लढविण्याच्या उद्देशाने शिवसेना, भारतीय काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आले असून या एकत्रित पक्षांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्याचा संकल्प केला आहे. त्या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या वतीने दि २१नोव्हेंबर रोजी पुनाडे वशेणी सारडे, पिरकोन, कळंबुसरे, चिर्ले, सायंकाळी ५ वा धुतुम,६ वा.करळ सावरखार तर दि. २२ नोव्हेबर रोजी जसखार, - पागोटे, नवघर, भेंडखळ, डोंगरी, पाणजे, बोकडविरा, नविन शेवा या ठिकाणी गाव बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नरेश रहाळकर, महादेव घरत, संतोष ठाकूर, बी. एन.डाकी, गणेश शिंदे, कमळाकर पाटील, भारतीय काँग्रेस पक्षाचे विनोद म्हात्रे, डॉ. मनिष पाटील,

.../२

# रायगड जिल्ह्यात गेल्या नऊ वर्षात ३२७३ जणांना एचआयव्हीची लागण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यात गेल्या नऊ वर्षात ३ हजार २७३ जणांना एचआयव्हीची लागण झाली आहे. २०१४ ते २०२२ पर्यंत जिल्ह्यातील ३ हजार २७३ जण एचआयव्ही संक्रमित झाले असल्याची माहिती जिल्ह्याच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. यातील १ हजार ६४१ जणांचा मृत्यू झाला आहे.

युवा वर्ग हा एचआयव्ही/एड्सच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा घटक असून युवक युवतींमध्ये एचआयव्ही संसर्ग होण्याचा जास्त धोका आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युवकांची ऊर्जा, उत्साह आणि धोका पत्करण्याची / बिनधास्त वर्तणूक असल्यामुळे त्यांच्यामध्ये एचआयव्ही संसर्ग होण्याची शक्यता इतरांपेक्षा जास्त आहे. याकरिता विविध गटांमध्ये एचआयव्ही/एड्स संवेदीकरण करून एचआयव्ही/एड्स रुग्णांना मुख्य प्रवाहामध्ये आणणे, कलंक व भेदभाव मिटविण्याकरिता प्रयत्न करणे. याकरिता रायगड जिल्ह्यातील २३ महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लबची स्थापना करून त्यांच्यामार्फत एचआयव्ही/एड्सविषयी जनजागृती केली जाते व एचआयव्ही तपासणी करिता प्रोत्साहन दिले आहे. रायगड जिल्ह्याकरीता जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, रायगड – अलिबाग यांचेमार्फत एचआयव्ही/एड्स ला प्रतिबंध करण्यासाठी एचआयव्ही समुपदेशन व तपासणी तसेच एचआयव्ही एड्सची कारणे लक्षणे समज गैरसमज या विषयी शास्त्रीय माहिती देऊन जनजागृती करून एचआयव्ही/एड्सला प्रतिबंध केला जातो.

मानवी प्रतिकार शक्तीचा – हास करणारा विषाणू म्हणजे एचआयव्हीचा विषाणू होय.जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड – अलिबाग अंतर्गत जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालय व नगरपालिका दवाखाना तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, खाजगी रुग्णालये यांचेमार्फत मोफत एचआयव्ही समुपदेशन व तपासणी केली जाते व एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती केली जाते. तसेच एचआयव्ही/एड्सला प्रतिबंध केला जातो. एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्य करीता जिल्ह्यामध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागामार्फत जागतिक एड्स दिन, आंतरराष्ट्रीय युवा दिन, महिला दिन, रक्तदान दिन या सारख्या अनेक दिनांचे औचित्य साधुन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वरील कार्यक्रम यशस्वी रीत्या राबविण्यासाठी तसेच एचआयव्ही एड्सला प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने तसेच जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने व टीम जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड– अलिबाग यांचे कडून कार्यक्रमाचे नियोजन तसेच अमलबजावणी करण्यात आली आहे.

# अखेर सांडपाणी वाहिनीच्या दुरुस्तीला प्रारंभ ; शिरगाव ग्रामस्थांच्या काही मागण्या मान्य

**दै.रायगड नगरी । महाड**

शिरगांवनजिक फुटलेल्या रासायनिक सांडपाणी वाहिनीच्या दुरुस्तीच्या कामाला आज शिरगांव ग्रामस्थांनी कडवा विरोध केला. प्रशासनाने ग्रामस्थांच्या काही मागण्या मान्य केल्यानंतर या कामाला प्रारंभ करण्यात आला. मात्र, यावेळेस शिरगांवचे सरपंच सोमनाथ ओझर्डे आणि युवा सेना (शिंदे गट) कोकण विस्तारक विकास गोगावले यांच्यात चांगलीच शाब्दिक चकमक घडली. ही वाहिनी फुटली की फोडण्यात आली याची चौकशी करुन, फोडली असल्यास कुणी फोडली त्याचा शोध घेवून गुन्हे दाखल करण्याची मागणी विकास गोगावले यांनी केली.

सोमवारी रात्री ही सांडपाणी वाहिनी फुटल्यानंतर सीईटीपीचे चेअरमन संभाजी पठारे यांनी घटनास्थळी यावे , सीईटीपीवर गुन्हा दाखल करण्यात यावा, सीईटीपीचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासक नेमण्यात यावा, नुकसान भरपाई देण्यात यावी, शिरगाव प्राथमिक शाळा आणि पोलीस चौकीला नळ जोडणी देण्यात यावी, शिरगांव येथील तरुणांना कारखान्यांमध्ये कायम स्वरूपी नोकरी देण्यात यावी अशा मागण्या करित सोमनाथ ओझर्डे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी दुरुस्तीच्या कामाला विरोध केला होता.

आज औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी या ठिकाणी दुरुस्तीचे काम करण्यास आले असता, सरपंच सोमनाथ ओझर्डे यांच्या नेतृत्वाखालील गटाने मागण्या मान्य झाल्याखेरीज काम सुरु करु देणार नाही , अशी भूमिका घेतली. दरम्यान, या प्रकाराची माहिती मिळताच विकास गोगावले हे देखील घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी काम सुरु करण्याची सूचना केली. त्यावेळेस विकास गोगावले या प्रकरणात राजकारण करत असल्याचा आरोप सोमनाथ ओझर्डे यांनी केल्याने वादाला तोंड फुटले. ही वाहिनी आपोआप फुटली आहे की कुणी जाणीवपूर्वक फोडली आहे याचा तपास व्हावा आणि गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी भूमिका विकास गोगावले यांनी घेतली. त्यातून हे प्रकरण हमरीतुमरीवर पोहोचले.

या ठिकाणी वाद होण्याची शक्यता असल्याने आधीपासूनच या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाद होत असल्याची माहिती मिळताच तहसिलदार सुरेश काशिद आणि अधिकारी वर्ग घटनास्थळी दाखल झाला. शिरगांव ग्रामस्थ आणि एमआयडीसीचे अधिकारी यांच्याशी त्यांनी चर्चा केली. त्यातून शिरगांव ग्रामस्थांच्या दोन मागण्या मान्य करण्यात आल्या. त्यानंतर या कामाला प्रारंभ करण्यात आला. दरम्यान, या सर्व प्रकारामुळे कारखानदारांमध्ये मात्र अस्वस्थता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. हे वाद असेच वरचेवर उफाळून आले तर महाड औद्योगिक वसाहतीमध्ये कारखाने चालविणे अवघड होवून बसेल अशा प्रतिक्रिया कारखानदारांमधून व्यक्त होत आहेत.

## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून नवीन पनवेल येथील ओपन जिमचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून नवीन पनवेल येथील ओपन जिमचे उदघाटन जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते आज करण्यात आले.

शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना नविन पनवेल शहर शाखेतर्फे आदरांजली वाहण्यात आली व पक्षप्रमुख तथा मा. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिव–सेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या पाठपुराव्यामुळे मिळालेल्या नविन पनवेल शहर सेक्टर ५ येथील ओपन जिमचे उद्घाटन शिव–सेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या वेळी तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, महानगर समन्वयक दिपक घरत, उपतालुका प्रमुख जगदीश शेळके, उपमहानगर प्रमुख किरण ता–वदारे, शहर प्रमुख नवीन पनवेल यतीन देशमुख, शहर प्रमुख पनवेल प्रवीण जाधव, शहर प्रमुख खांदाकॉलनी सदानंद शिर्के, महिला आघाडीच्या शहर संघटिका अपूर्वा प्रभु, शारदा पाटील आदि पदाधिकारी आणि जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेची वर्षपूर्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

’सूर निरागस हो या संगीतप्रेमी समूह प्रस्तुत ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेची वर्षपूर्ती संपन्न झाली. पनवेल येथील ब्रह्मचैतन्य साधना केंद्र येथे या निमित्ताने युवाशास्त्रीय गायिका स्वराली पणशीकर यांचे गायन संपन्न झाले. सुरेल स्वर आणि उत्तम सादरीकरण हे गुणवैशिष्ट्य असलेल्या स्वराली यानी आपल्या गायनाची सुरुवात श्रीराम भजनाने करून यमन राग सादर केला. त्यानंतर अभंग, नाट्यगीत व काही अप्रचलित गाण्यांचे सादरीकरण करून त्यांनी रसिकांची प्रशंसा प्राप्त केली. अथर्व देव यानी संवादिनी, सुहास चितळे यानी तबला, विशाल जोगळेकर यांनी पखवाज व आदित्य उपाध्ये यानी तालवाद्यांची साथसंगत केली. साधना केंद्रातील सदस्यानी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

## मराठी पत्रकार परिषदेच्या कार्याध्यक्षपदी मिलिंद अष्टीवकर यांची निवड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



मराठी पत्रकारांची मातृसंस्था म्हणुन परिचित असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या कार्याध्यक्षपदी रायगड जिल्ह्यातील रोहा येथील मिलिंद सिताराम अष्टिवकर तर सरचिटणीसपदी अहमदनगर येथिल मन्सूर शेख यांची निवड करण्यात आली आहे. परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे यांनी पुणे येथिल बैठकीत ही घोषणा केली.

रायगड जिल्हा प्रेस क्लब चे माजी अध्यक्ष असलेले मिलिंद अष्टिवकर हे रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्याही कार्यकारिणीवर आहेत. यापूर्वी त्यांनी मराठी पत्रकार परिषदेचे माजी कोषाध्यक्ष, माजी कोकण विभागीय सचिव म्हणूनही काम पाहिले आहे. तसेच ते कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष म्हणून देखील ते कार्यरत होते. त्यांच्या या कार्यकाळात कोकणातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. रोहा येथुन दैनिक लोकमत, दैनिक नवशक्ती अशा विविध जिल्हा दैनिकांमध्ये ते वार्ताहर, प्रतिनिधी म्हणुन कार्यरत आहेत.

भारत सरकारच्या माहिती व प्रस–ारण मंत्रालया अंतर्गत विविध राज्यांचा अभ्यास दौऱ्यात हि त्यांनी सहभाग घेतलेला आहे. जिल्हा प्रेस क्लबचा त्यांचा अध्यक्षीय कार्यकाळ मुंबई गोवा महामार्ग चौपदरीकरण मागणी साठीच्या विविध आंदोलनांमुळे संस्मरणिय ठरला आहे. त्यांच्या या नियुक्तीचे स्वागत सर्वस्तरातुन होत असून परिषदेचे मुख्य विश्वस्त ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षा सुप्रियाताई पाटील, उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष भारत रांजणकर, परिषदेचे कोकण विभगिय सचिव जे डी पराडकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, रोहा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय देसाई, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष शशिकांत मोरे आदींनी त्यांचेकडे संपर्क साधुन त्यांचे अभिनंदन केले आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शिवलाल रामदास सिंह हे दुकान / गाळा क्र.१, तळमजला, मेहमुद चेंबर्स, फायनल प्लॉट नं.४७८/२, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगडचे कायदेशीर मालक आहेत. सदर दुकान / गाळ्याचे श्री.रमेशकुमार श्यामजी शाह व मे.एम.पी.कन्स्ट्रक्शन यांचेतील दि.१८/०३/१९९६ रोजीचे मुळ साठेकरार पनवेल परिसरात दि.१३/११/२०२२ रोजी गहाळ झाले आहे.

सबब संबंधित पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दि.१८/०३/१९९६ रोजीचे मुळ साठेकरार गहाळ झाल्याची नोंद under Lost Property Registration No.2307/2022 अंतर्गत केली आहे.

जर कोणत्याही व्यक्तींचा सदरच्या दुकान / गाळ्यासंबंधी काही हक्क, दावा, अथवा सदरच्या मुळ कागदपत्रासंबंधी काही हरकत असल्यास किंवा सदरचे मुळ कागदपत्र त्यांना सापडले असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत तशी हरकत वा दावा नोंदवावा व कागदपत्र आणून द्यावे अन्यथा सदरचे दुकान / गाळ्या संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत वा दावा नाही किंवा सदरच्या दुकान / गाळ्याचे मुळ दस्त नाहीत असे समजण्यात येईल.

दि.१७/११/२०२२
स्थळ : पनवेल

**सही/–**
**कुसुम किरण घरत**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**पीएल ६ए/६/०:२, एमएसईबी ऑफिस जवळ, सेक्टर १, खांदा कॉलनी, नवीन पनवेल**
**मो.नं.९९६७३३५०४६**

## फ्रीडम रायडर बाईकर रॅलीचे खोपोलीत जंगी स्वागत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून ७५ बाईकर्स पुर्ण भारतभर, भारताचा सांस्कृतिक वारसा, शारिरीक स्वास्थ्य आणि बंधुभाव वृध्दींगत करण्यासाठी भ्रमंती करणार आहेत. याच आयोजनातून पुण्याहून मुंबईकडे प्रस्थान करत असताना रायगड जिल्ह्याचे प्रवेशद्वार असलेल्या खोपोली शहरात रॅलीच्या स्वागताचा आणि कौतुकाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. याप्रसंगी शुभेच्छा आणि स्वागत करण्याकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, महाराष्ट्र राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र हातनूर, खा–लापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार, तालुका क्रीडा समन्वयक जगदीश मरागजे, जेष्ठ क्रीडा शिक्षक राजाराम कुंभार, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर, अमोल कदम, हनिफ करजीकर, दिलीप देशमुख, विजय चव्हाण, भरत शिंदे, दिवेश पालांडे आणि खालापूर तालुका शिक्षण प्रस–ारक मंडळाचे पदाधिकारी कर्मचारी, खेलो इंडिया अभियानातील खेळाडू तसेच स्व.भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकूल यांच्या वतीने शेकडो विद्यार्थी आणि खेलो इंडिया कुस्ती केंद्राचे कुस्तीगीर, खेळाडू उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

उरण येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण

क्रि.चौ.अर्ज क्र.१८६/२०२२
नि.नं.८/ड

श्री.ज्ञानेश्वर रामचंद्र नाईक
रा.केगाव–आवेडा, ता.उरण,
जि.रायगड, पिन क्र.४००७०२ — अर्जदार

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत केगांव
पत्ता : केगांव, ता.उरण,
जि.रायगड, पिन नं.४००७०२ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.मोरेश्वर रामचंद्र नाईक रा.केगांव–आवेडा, ता.उरण, जि.रायगड कै.मोरेश्वर रामचंद्र नाईक हे दि.१७/०३/१९८५ रोजी आपल्या राहत्या घरी मौजे : केगांव–आवेडा येथे निधन झाले आहेत. परंतु ग्रुप ग्रामपंचायत केगांव येथे सदर मृत्यूची नोंद उपलब्ध नसल्याकारणी अर्जदार यांनी आपला भाऊ कै.मोरेश्वर रामचंद्र नाईक ह्यांची मृत्यूची नोंद करण्याकरिता जन्म मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) अंतर्गत मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज करण्यात आलेला आहे. कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून योग्य ते आदेश केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज दि.१७/११/२०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयात यांचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

मा.पांडे साहेब कोर्ट
ॲड.आकाश उदेश डोंगरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

क्रि.चौ.अर्ज क्र.१३०५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१९/१२/२०२२

श्री.कचरु जनार्दन फडके — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी कै.शांताबाई महादू फडके ह्या दि.१८/०३/१९५२ रोजी रा.विठ्ठल मंदिर, मुक्काम ढोंगरेचा पाडा, पोस्ट देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. परंतु काही कारणास्तव अनावधनाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. सबब कारणे सदरचे अर्जदार यांची आजी कै.शांताबाई महादू फडके यांच्या मृत्यू नोंदणी करण्याचे आदेश निर्गमित अधिकारी, पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड यांना देण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब सदर फौजदारी चौकशी अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म–मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करून मिळण्याकरिता अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर मृत्यूच्या नोंदीच्या अर्जाचा आदेश मिळण्याकरिता कोणाच्याही, कसल्याही व कोणत्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत मृत्यूच्या नोंदचा आदेश दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.१७/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

### म्हसळा नगर पंचायत, म्हसळा

**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ २१०९ / २०२२ दिनांक :- १७/११/२०२२**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रमाक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १४९३ पैकी | एकता नगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. १ | विकास लिंबाजी चव्हाण | धर्मा रामचंद्र धामणकर |
| २ | २ | १३० पैकी | म्हसळा बाजारपेठ | कमर्शियल सेंटरवन प्लाझा आर. सी. सी. पद्धतीत इमारत C विंग तळ मजला गाळा नं. ८ | हुसैना नविद नारकर | मयूर मधुकर गायकर |
| ३ | २ | ६८४ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | कमर्शियल मुंगये कॉम्प्लेक्स आर. सी. सी. पद्धतीत निवासी इमारत तळ मजला गाळा नं. ७ (G+२) बिल्टप क्षेत्र | खालीद इनायतुल्ला मुंगये | खलील अ.शकूर गणतारे |
| ४ | २ | १७१३ पैकी | एकता नगर | पोतदार कुळसौमिनी अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. १ | नलिनी लक्ष्मण गोसावी | स्नेहल विजय खेडेकर |
| ५ | २ | १०८१ पैकी | नवानगर | फरीदा कॉम्प्लेक्स आर. सी. सी. पद्धतीत बांधलेलो इमारत तळ मजला B विंग फ्लॅट नं. ४ | अब्दुल अझीझ शब्बीर बशारत | सादिक खान हसन खान |
| ६ | २ | १७६४ पैकी | म्हसळा बौद्धवाडी | सलसबील अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. २ | दिलीप बाळू कांबळे | अशरफअली हाजिमिया घराडे |
| ७ | २ | १७६४ पैकी | म्हसळा बौद्धवाडी | कमर्शियल सलसबील अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. ५ | इकबाल अहमद अब्दल्ला सैबोले<br>असलम इकबाल सैबोल<br>आसीम इकबाल सैबोल<br>इरम इकबाल सैबोल | शैनाज मोहम्मद हनीफ मुंगये |
| ८ | २ | २०१४ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. २ | दिलशाद अब्दुल सत्तार पेणकर | शराफत अ. रज्जाक घरटकर |
| ९ | २ | १८१५ पैकी | नवानगर | सिल्व्हर अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला A विंग फ्लॅट नं. १०४ | मुख्तार निसार बागकर | नाझनीन अब्दुल गफ्फार उमरे |
| १० | २ | ५५६ पैकी | म्हसळा बाजारपेठ | कमर्शियल आर. सी. सी. पद्धतीत तळ मजला गाळा नं. ३ | अभीजीत दिलीप करंबे | रफी अहमद अताऊल्ला हुर्जुक |
| ११ | ३ | १४६२ | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेले घर डब्बल | अब्दुल कुद्रूस म. इकबाल रोघे | दिलशाद बेगम म. इकबाल रोघे<br>अब्दुल कुद्रूस म. इकबाल रोघे<br>शादाब म. इकबाल रोघे<br>सहिम म. इकबाल रोघे<br>यास्मीन आब्दुला रजानी |
| १२ | ३ | ४७ | कुंभारआळी | सिमेंट पत्रे सिमेंट रेतीत बांधलेले घर | रामचंद्र पांडुरंग म्हशिलकर | उषा रामचंद्र म्हशिलकर<br>उदय रामचंद्र म्हशिलकर<br>प्रशांत रामचंद्र म्हशिलकर<br>मेघना रामचंद्र म्हशिलकर |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आ.प्रशांत ठाकूर यांनी केले साहिल जाधवचे कौतुक

स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन इंडिया राष्ट्रीय खो–खो स्पर्धेत रोमहर्षक व अतीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात अप्रतिम खेळ खेळत महाराष्ट्र संघाने बलाढ्य आंध्र प्रदेश संघाचा पराभव करीत दिमाखात सुवर्णपदक पटकावले. पंजाब येथे संपन्न झालेल्या याच स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन इंडिया राष्ट्रीय खो– खो स्पर्धेत महाराष्ट्र संघाचा उपकर्णधार रोहा तालुक्यातील पोफळघर येथील स्टार खो–खो खेळाडू साहिल संतोष जाधव याने संपूर्ण स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात उत्तमोत्तम सुवर्ण कामगिरी बजावत महाराष्ट्र संघाला विजेतेपद मिळवून दिले. त्याच्या या कामगिरीमुळे या स्पर्धेत साहिलचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मान करण्यात आला. याचबरोबर या स्पर्धेतील साहिल जाधव याने केलेल्या चमकदार कामगिरीमुळे त्याची नुकतीच भारतीय खो–खो संघात निवड झाली. याच पार्श्वभूमीवर साहिलचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी देखील साहिलच्या या अप्रतिम कामगिरीचे कौतुक करत पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याच दरम्यान मैदानी खेळाची आवड जोपासणारे तसेच वेळोवेळी खेळाडूंना प्रोत्साहन देत सर्वोतोपरी सहकार्य करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोलाचे सहकार्य साहिल जाधव याला त्याच्या या प्रवासात लाभले असल्याचे रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर यांनी सांगितले.

## उरणमध्ये ग्रामपंचायत निवडणूकी संदर्भात महाविकास आघाडीचे बैठक सत्र सुरू

बाजीराव परदेशी, किरीट पाटील, प्रकाश पाटील, महेंद्र ठाकूर, शेतकरी कामगार पक्षाचे विकास नाईक, नरेश घरत, सुरेश पाटील, महादेव बंडा, सागर कडू, रमाकांत म्हात्रे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे मनोज भगत, वैजनाथ ठाकूर, भार्गव पाटील, समाधान म्हात्रे, गणेश नलावडे, रमण कासकर तसेच महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांचे या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार असल्याचे आघाडीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सुमा सिद्धार्थ शिरूर यांचा जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या वतीने सत्कार संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील अर्जून पुरस्कारप्राप्त सुप्रसिद्ध नेमबाज क्रीडा मार्गदर्शक सुमा सिद्धार्थ शिरूर यांना केंद्र शासनाच्या क्रीडा विभागाचा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाल्यामुळे त्यांचा जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी जिल्हाधिकारी रायगड तथा जिल्हा क्रीडा परिषदेचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने पनवेल येथील लक्ष शूटिंग क्लब येथे पुष्पुच्छ देऊन अभिनंदन केले.

याप्रसंगी माणगाव तालुका क्रीडा अधिकारी श्री.राजेंद्र अतनूर, राज्य क्रीडा मार्गदर्शक श्रीमती मनिषा मानकर, पन–वेल महानगरपालिका क्रीडा समन्वयक श्री.समीर रेवाळे आदी उपस्थित होते.

## ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेची वर्षपूर्ती,'स्वराली पणशीकर यांचे गायन संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'सूर निरागस हो या संगीतप्रेमी समूह प्रस्तुत ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेची वर्षपूर्ती संपन्न झाली. पनवेल येथील ब्रह्मचैतन्य साधना केंद्र येथे या निमित्ताने युवाशास्त्रीय गायिका स्वराली पणशीकर यांचे गायन संपन्न झाले.

सुरेल स्वर आणि उत्तम सादरीकरण हे गुणवैशिष्ट्य असलेल्या स्वराली यानी आपल्या गायनाची सुरुवात श्रीराम भजनाने करून यमन राग सादर केला. त्यानंतर अभंग, नाट्यगीत व काही अप्रचलित गाण्यांचे सादरीकरण करून त्यांनी रसिकांची प्रशंसा प्राप्त केली.

अथर्व देव यानी संवादिनी, सुहास चितळे यानी तबला, विशाल जोगळेकर यांनी पखवाज व आदित्य उपाध्ये यानी तालवाद्यांची साथसंगत केली. साधना केंद्रातील सदस्यानी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

# गोवरची लक्षणे आढळल्यास आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गोवर विषाणूपासून होणारा आजार असून गोवर विषाणू रुग्णांच्या खोकल्याद्वारे हवेमार्फत पसरतो व संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या श्वसन संस्थेतून शरीरात प्रवेश करतो. या रोगाची लक्षणे आढळल्यास घाबरून न जाता जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा व काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे यांनी केले आहे.

ताप येणे, शरीरावर लाल पुरळ येणे, डोळे लाल होणे ही गोवरची लक्षणे आहेत. गोवरच्या विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर सात ते दहा दिवसांनी लक्षणे दिसण्यास सुरुवात होतात. सुरुवातीस ताप व खोकला, सर्दी, डोळे लाल होणे यापैकी एक–दोन किंवा तीनही लक्षणे असू शकतात. दोन–चार दिवसानंतर सर्व अंगावर पुरळ येणे, ते कानाच्या मागे, चेहरा, छाती, पोटावर पसरतात. त्यामुळे वेळीच काळजी घेऊन संभाव्य धोके टाळता येऊ शकतात, असे आरोग्य विभागाने कळविले आहे.

गोवर झालेल्या रुग्णाच्या शरीरातील अ जीवनसत्वाचे प्रमाण कमी होते. अ जीवनसत्व कमी झाल्याने रुग्णाला डोळ्यांचे आजार व अतिसार, न्युमोनिया, मेंदूज्वर असे आजार होऊ शकतात. गोवर झालेल्या रुग्णास लागोपाठ दोन दिवस अ जीवनसत्वाची मात्रा दिल्यास हे आजार होण्याची शक्यता कमी असते, असे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे.

गोवर रोग टाळण्यासाठी लसीकरण प्रभावी मार्ग असून प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये लस उपलब्ध आहे. लसीकरणाच्या वेळापत्रकाप्रमाणे लसीकरण केल्यास गोवर रोग टाळता येतो. ज्या बालकांचे गोवर/रुबेला लसीकरण झाले नसेल त्यांचे लसीकरण करून घेणे आवश्यक आहे.

लसीचा पहिला डोस ९ महिने पूर्ण ते १२ महिने व दुसरा डोस १६ ते २४ महिने या वयोगटात देण्यात येतो. गोवरची लक्षणे आढळल्यास त्वरित आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा व डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे यांनी केले आहे.

# मुरूड शिवसेनेच्या वतीने हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतीदिन साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड शहर शिवसेनेच्या वतीने हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी सुरुवातीला जेष्ठ शिवसैनिक माजी नगरसेवक प्रमोद भायदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर तालुका युवा संघटक कुणाल सतविडकर यांनी हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत घोषणा देण्यात आल्या या प्रसंगी शहरप्रमुख आदेश दांडेकर, उपशहरप्रमुख प्रशांत कासेकर, उपशहरप्रमुख विजय वाणी, महिला शहर संघटिका सुहासिनी सुभेदार, उपतालुकाप्रमुख अशिल ठाकुर, विभाग प्रमुख राजेश मुळेकर, उपविभाग प्रमुख रुपेश जामकर, माजी नगरसेवक अविनाश दांडेकर, देवेंद्र सतविडकर, कॉंग्रेस कार्यकर्ते दर्शन काळबेरे, अभिजीत सुभेदार, अच्युत चव्हाण, ऊत्कर्षा धोत्रे, दिपाली जामकर, अजय वाडकर, सुर्या सतविडकर, सुनील शेळके, वंदेश पाटील यांच्या सह अनेक शिवसैनिक, पदाधिकारी उपस्थित होते.



## उरण तालुक्यातील जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनसेची आमसभेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील प्रश्न सोडविण्यासाठी आमसभा आयोजीत करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर, तालुकाध्यक्ष सत्यवान भगत यांनी उरण पंचायत समिती कडे केली आहे. गेल्या काही महिन्या पासून उरण तालुक्यातील जनतेच्या प्रश्न सोडवीण्यासाठी ते सातत्याने विवीध मार्गाने प्रयत्न करत आहेत. त्यासाठी आमसभा हा एक उत्तम पर्याय आहे .तसेच उरण तालुक्यातील बऱ्याच ग्रामपंचायतीतील भ्रष्ट्राचाराबाबत त्यांनी अधिकारी वर्गाकडे नाराजी व्यक्त केली. त्यांनी गटविकास अधिकारी कार्यालयात दिलेल्या पत्रानुसार, उरण तालुक्यातील जनतेच्या समास्यांचे निवारण करण्यासाठी दर वर्षाला स्थानिक आमदार आणि लोकप्रतिनिधी शासकीय अधिकारी यांच्या सोबत आमसभा घेतली जाते. परंतु कोव्हीडच्या काळापासून आजतागायत सभेचे आयोजन झालेच नाही. शिवाय अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान, समुद्र किनाऱ्याच्या बांध बंधिस्तीमुळे हजारो एकर जमीन क्षेत्रात भरतीचे पाणी येत असल्याने मोठ्या प्रमाणत शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. असे इतरही तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी लवकरात लवकर आमसभा लावून जनतेचे प्रश्न सुटावे ह्या करता तातडीने आमसभेचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पनवेल तालुक्यात सुवर्णा भात जातीच्या पिकाचा पीक कापणी प्रयोग पूर्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रात पिकांच्या उत्पादनाची माहिती अंतिम करण्यासाठी सन १९४४ सालापासून खरीप व रब्बी हंगामात पीक कापणी प्रयोग राबविण्यात येत असून, याबाबत महाराष्ट्र शासनाने पीक कापणी प्रयोग व्यवस्थित रितीने होण्यासाठी वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. महसूल, कृषी व ग्रामविकास विभाग यांच्यामध्ये आवश्यक त्या प्रमाणात वाटप करुन व समन्वय साधून पिक कापणी प्रयोगाची आखणी व अंमलबजावणी गेली अनेक वर्षे सुरु आहे.

या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यामध्ये खरीप हंगामासाठी पीक कापणी प्रयोगाकरीता तालुका कृषी अधिकारी यांच्याकडील दि.१३ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या सुधारीत यादीनुसार गावनिहाय एकूण १८ (एका गावासाठी प्रत्येकी २ असे एकूण ३६) पीक कापणी प्रयोग निश्चित केले आहेत.

त्यानुसार आंबे तर्फे वाजे येथे शेतकरी बाळाराम पालांडे आणि वसंत पाटील यांच्या शेतात सुवर्णा या भात जातीच्या पिकाचा पीक कापणी प्रयोग पूर्ण करण्यात आला. यावेळी नायब तहसिलदार राहूल सुर्यवंशी, मंडळ अधिकारी अजित पवार, तलाठी श्रीनिवास मेतरी, कोतवाल पद्माकर चौधरी व सिताराम वारगडा हे उपस्थित होते.

शासनाकडील निर्देशानुसार दि.१५ नोव्हेंबर २०२२ रोजी सर्व पीक कापणी प्रयोग महसूल, कृषी व ग्रामविकास विभाग यांना नेमून दिलेल्या उद्दिष्टांनुसार व संबंधित पर्यवेक्षण अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली यशस्वीरित्या पूर्ण करुन त्याची माहिती शासनाच्या उउए –सीळ या पवर अपलोड करण्यात आली आहे.

पिक कापणी प्रयोगातील प्राप्त आकडेवारी वरुन प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पिक कापणी प्रयोग हे पिकनिहाय नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करण्यासाठी अत्यंत आवश्यक बाब आहे. तसेच शासनास देखील पिक उत्पन्नाचा अंदाज, शेतमालाची खरेदी, शेतमाल निर्यात धोरण अशा विविध बाबीकरींता पिक कापणी प्रयोगातील आकडेवारीची आवश्यकता भासते.

---

मा.श्री.सोनावणे सो.

ॲड.हेमा भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल

दि.चौ.अर्ज क्र.१६२०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१२/२०२२

१) श्रीमती.निर्मला रमेश सिंह
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कु.प्रियंका रमेश सिंह
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कु.प्रिती रमेश सिंह
वय : २५ वर्षे, व्यवसाय :
सर्व रा.रुम नं.१०४, इमारत क्र.१४,
उसर्ली खुर्द, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

**सदनिकेचे वर्णन**

| गाव | सदनिकेचा वर्णन | किंमत |
|---|---|---|
| उसर्ली खुर्द | सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, बिल्डींग नं.४, संकल्प आशिर्वाद प्लॉट नं.१ ते १६ गट नं.१६७ मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल | १८००,०००/– |

सदरहू वरील अर्जदार क्र.१ ह्या कै.रमेश बल्ली सिंह यांच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र.२, ३ त्यांच्या मुली आहेत. रमेश बल्ली सिंह यांचे निधन दि.३०/०८/२०१९ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे झाले आहे. कै.रमेश बल्ली सिंह यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिकेमध्ये केलेली असून पनवेल महानगरपालिकेने कै.रमेश बल्ली सिंह त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/११/२०२२ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो.कोर्ट

ॲड.संगीता चेतन मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६३९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/१२/२०२२

विरेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा त्यांचे दि.२९/१२/२०२० रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल वाशी मुंबई येथे निधन झाले आहे. कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ विरेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.२ राजेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.३ संजयकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.४ सवारीदेवी राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.५ सुनितादेवी सुमित दुबे पुर्वाश्रमीची राधेश्याम मिश्रा ६ राज कुमारी विनय देव शुक्ला पुर्वाश्रमीची राज कुमारी राधेश्याम मिश्रा, हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| मौजे | मिळकत | क्षेत्र |
|---|---|---|
| सेक्टर–७, नवीन पनवेल (पु.), ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ | बिल्डींग नं.ई–११०, फ्लॅट नं.३, तळमजला, तेजोमय सोसायटी, सिडको कॉलनी, सेंट जोसेफ हायस्कूल जवळ, सेक्टर–७, नवीन पनवेल | १७.२०० चौ.मी. |

वरील मिळकतीस कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ विरेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.२ राजेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.३ संजयकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.४ सवारीदेवी राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.५ सुनितादेवी सुमित दुबे पुर्वाश्रमीची सुनितादेवी राधेश्याम मिश्रा, ६ राज कुमारी विनय देव शुक्ला पुर्वाश्रमीची राज कुमारी राधेश्याम मिश्रा, हेच कायदेशीर वारस आहेत. वरील मिळकतीस वरील नमूद अर्जदारांची नावे लावण्याचे असल्यामुळे वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरच्या अर्जास इतर अन्य कोणाचीही हरकत असल्यास अथवा अर्जदार व सामनेवाला व्यतिरिक्त अन्य कोणी कायदेशीर वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे.कोर्टात हजर राहून लेखी हरकत कागदपत्र व पुराव्यांसह घ्यावयाची आहे.

तरी या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, विहित मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे वारसांना दाखला देण्यास येईल. तद्नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

आज दि.१६/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.श्री.सोनावणे सो.कोर्ट

ॲड.राजेश बांगर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६५२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१) सौ.विजस्वी प्रभाकर म्हात्रे
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) विनित प्रभाकर म्हात्रे
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
३) सौ.प्रियांका चंद्रशेखर पाटील पुर्वाश्रमीची
प्रियांका प्रभाकर म्हात्रे
वय : २९ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.कोपर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ३ यांची आजी कै.काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांचे दि.१९/१२/१९८९ रोजी मौजे : कोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथे देहावसन झालेले आहे. कै.काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांचा मुलगा कै.प्रभाकर पदू म्हात्रे यांचे दि.१६/१०/२००१ रोजी मौजे : कोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथे देहावसन झालेले आहे. कै.प्रभाकर पदू म्हात्रे यांची पत्नी कै.कल्पना प्रभाकर म्हात्रे दि.१३/०६/२००८ रोजी मयत झालेली आहे. कै.काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांस कै. प्रभाकर पदु म्हात्रे हेच एकमेव वारस असून कै.प्रभाकर पदू म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार यांनी त्यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मा.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टातून दिवाणी चौकशी अर्ज क्र.१४४२/२०२१ अन्वये प्राप्त करून घेतलेला आहे. सबब कै.काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांस सदर अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. विजस्वी प्रभाकर म्हात्रे वगैरे ह्यांनी कै. काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी मिळणाऱ्या भूखंडाचे वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ४१० | ७७/१० | ०–२५–५ | २.१८ |

वर विजस्वी प्रभाकर म्हात्रे वगैरे हे कै.काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट विजस्वी प्रभाकर म्हात्रे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.काळुबाई पदू उर्फ पदाजी म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१७/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस व विशेष करुन मौजे खालापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे, आमचे अशिल सौ. कविता गणेश वाघ, वय ५६ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. २२१६, सापके चाळ, रामनगर, वागळे इस्टेट, ठाणे (प) ४००६०४ यांची मौजे नंदनपाडा, ता. खालापूर, जि. रायगड, तलाठी सजा नारंगी येथील खालील वर्णनाची मिळकत

| क्रमांक | सर्व्हे नंबर | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ३८ | १ | ०–२६–५०<br>पो.ख. ०–०६–१०<br>०–३२–६० | १=६२ |
| २ | ३८ | ४ | ०–०५–००<br>पो.ख. ०–०१–३०<br>०–०६–६० | ०=६० |
| ३ | ३९ | १ अ | ०–४९–३०<br>पो.ख. ०–०५–३०<br>०–५४–६० | १=७५ |
| ४ | ३९ | २ | ०–१२–१०<br>पो.ख. ०–००–५०<br>०–१२–६० | ०=९५ |
| ५ | ४८ | २ | ०–०८–१०<br>पो.ख. ०–००–५०<br>०–०८–६० | ०=५५ |
| ६ | ४८ | ३ | ०–०७–१०<br>पो.ख. ०–००–५०<br>०–०७–६० | ०=९५ |

सदरील मिळकत ही आमच्या अशिलांची आजी कै. लक्ष्मीबाई तुकाराम पाटील त्यांचा मुलगा कै. मोहन तुकाराम पाटील व त्यांची पत्नी कै. शैला मोहन पाटील यांची एकुलती एक मुलगी नात सौ. कविता मोहन पाटील उर्फ कविता गणेश वाघ यांचे वाडवडिलोपार्जित असून कायदेशीर हक्कान्वये प्राप्त मिळकत फेरफार क्र. १०८ अन्वये कै. लक्ष्मीबाई तुकाराम पाटील व इतर २ बहिणी अशी वारस म्हणून नावाची नोंद आहे. कै. लक्ष्मीबाई तुकाराम पाटील यांची एकुलती एक नात सौ. कविता गणेश वाघ या असून या वर नमुद मिळकतीत त्यांचा १/३ हिस्सा आहे. त्यामुळे त्यांनी कै. लक्ष्मीबाई तुकाराम पाटील यांचा कायदेशीर वारस असल्याचा मे. खालापूर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो., यांचा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस असल्याबाबतचा दाखल प्राप्त केला असल्याचे समजलेवरुन सदर मिळकतीत नावाची वारस म्हणून नोंद करण्यास गेले असता आमचे अशिलांस सदरील मिळकतीचे कै. लक्ष्मीबाई तुकाराम पाटील यांच्या जागी जयश्री जनार्दन पाटील या महिलेचा फोटो व आधार कार्ड जोडून दि. १५/०७/२०१९ रोजी खरेदीखत दस्त क्र. ३०३६/२०१९ हे दस्त नोंदणीदस्त केलेले आहे असे समजले. त्यानंतर वरील नोंदणीदस्त दस्त दुय्यम निबंधक कार्यालयातून प्राप्त केला.

आमच्या अषिलांनी श्री. अमोल दत्तात्रेय पाटील याने फसवून वर नमुद मिळकतीचे अखत्यारपत्र दस्त क्र. ५२१३/२०१९ दि. १६/१२/२०१९ रोजी खालापूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीदस्त करुन घेतले आहे. सदरील कुळमुखत्यारपत्र लिहुन देणार आमचे अषिल यांनी तुम्ही लिहुन घेतलेले तथाकथित कुळअखत्यार पत्राबाबत आमचे अशिलांना काही एक माहिती नव्हती व त्या अखत्यारपत्रामध्ये वर नमुद सगळ्याा मिळकतींबाबत अधिकार दिलेले आहेत याबाबत कोणतेही माहिती अथवा आमच्या अशिलांशी तुमचेपैकी तथाकथित अखत्यारी श्री. अमोल दत्तात्रेय पाटील व ओळख देणार साक्षीदार विष्णु नाथा पवार व रुपेश मधुकर जाधव यांनी काही माहिती दिली नाही अथवा सांगितले नाही. याबाबत आमच्या अशिलांना फसवून व बनावटरित्या माहिती देऊन तुम्ही आमच्या अशिलांना दुय्यम निबंधक कार्यालयात घेऊन आलात व सदर मिळकत विकत घेणार श्री. तुषार पाचारणे व श्री. महेश पाचारणे यांनी या अगोदर बोगस व बनावटरित्या खरेदी केलेली मिळकत सर्व्हे नं. ३८/१ व ३९/२ दस्त क्र. ३०३६/२०१९ या नोंदणीदस्त बोगस, बनावट खरेदी दस्तास आमच्या अशिलांच्या आजी कै. लक्ष्मीबाई तुकाराम पाटील हिच्या जागी बोगस जयश्री जनार्दन पाटील या महिलेस उभी करुन केलेले अखत्यारपत्र व त्या आधारे केलेले खरेदीखत बेकायदेशीर व बनावट आहे असा बोगस दस्त कायदेशीर करण्यासाठी तुम्ही आमच्या अशिलांस थोड्याफार रकमेचे अमिष दाखवून आणि त्यासोबत पुन्हा त्यांना फसवून त्यांना माहिती न देता सदरील खोटे, बनावट तथाकथित अखत्यारपत्र दस्त क्र. ५२१३/२०१९ तयार केलेले आहे व तो दस्त वर नमुद बनावट खरेदीदस्तास जोडून सदरील खरेदीखत कायदेशीर करण्याचा केविलवाणा अयशस्वी प्रयत्न केला आहे. त्यामुळे सदरील दस्त आमचे अशिलांवर बंधनकारक नसून त्यातील मजकुर मान्य व कबूल नाही.

सबब सदरील अखत्यार पत्र दस्त क्र. ५२१३/२०१९ यातील एकुण एक मजकुर आमच्या अशिलांना मान्य नसल्याने व सदरील अखत्यारपत्राचा तुम्ही तथाकथित अखत्यारी अमोल दत्तात्रेय पाटील व ओळख देणार विष्णु नाथा पवार, रुपेश मधुकर जाधव यांनी मंदार पाचारणे व तुषार पाचारणे यांनी केलेल्या बेकायदेशीर खरेदीखतास कायदेशीर करण्यासाठी व त्यातील बोगस व बनावट कृत्य झाकण्यासाठी पुनश्च या तुम्ही फसवून केलेल्या अखत्यारपत्र दस्त क्र. ५२१३/२०१९ अन्वये केलेला अयशस्वी प्रयत्न होता. मात्र यापुढे हे खरेदीखत व तुम्हाला दिलेले दस्त आम्ही रद्द केल्याने हे खरेदीखत देखील आमच्या अषिलांच्या हिश्यापुरते बेकायदेशीर व शुन्यकरणीय झालेले आहे व आमचा अशिलांचा कायदेशीर हक्क अबाधित आहे याची तुम्ही नोंद घ्यावी.

आता यापुढे या तुम्हाला दिलेल्या नोटीस रजि. ए. डी. दि. १७/११/२०२२ व आता या दैनिक पेपरला जाहीर प्रकटन करुन आमचे अशिल तुम्हाला दिलेल्या अखत्यारपत्रावर अधिकार काढून घेतलेले असून यापुढे तुम्ही या अखत्यारपत्राच्या आधारे कोणतेही काम करणेचे नाही कारण सदरील अखत्यारपत्रान्वये तथाकथित अखत्यारी अमोल दत्तात्रेय पाटील यांना दिलेले अधिकार हे या नोटीसने रद्द केलेले आहेत. याची देखील तुम्ही नोंद घ्यावी. सदरील अमोल दत्तात्रेय पाटील यांचे अधिकार या नोटीसने अखत्यारपत्र दस्त क्र. ५२१३/२०१९ मध्ये दिलेले अधिकार व अखत्यारपत्राचा हेतु हे आमचे अशिलांना फसवून व बनावटरित्या व चुकीच्या माहितीच्या आधारे घेतल्याने ते आमचे अशिलांनी रद्द केलेले आहेत त्यामुळे अमोल दत्तात्रेय पाटील यांनी या अखत्यारपत्राच्या आधारे कोणतेही काम सदरील अखत्यारपत्र दाखवून करु नये आणि तसे केल्यास ते आमचे अषिलांवर बंधनकारक राहणार नाही याची देखील तथाकथित अखत्यारी अमोल दत्तात्रेय पाटील यांनी नोंद घ्यावी.

सबब सदरील जाहीर नोटीसने जनतेस कळविण्यात येते की, सदरील तथाकथित अखत्यारी अमोल दत्तात्रेय पाटील यांना दिलेले अखत्यार पत्र ५२१३/२०१९ हे रद्द केलेले आहे. याबाबत त्यांना लेखी सुचना दिलेल्या आहेत त्यामुळे या रद्द केलेल्या तथाकथित अखत्यार पत्रान्वये या तथाकथित अखत्यारी मार्फत व्यवहार करु नये अथवा सदरील मिळकत खरेदी करु नयेत किंवा विकत घेऊ नये अन्यथा सदरील व्यवहार आमचे अशिलांचे हिश्यापुरते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची देखील तुम्ही नोंद घ्यावी.

ठिकाण : मोहोपाडा
दि.१७/११/२०२२

**सही/–**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.एम.एम.मालकर**
**श्रीस्मरण बंगला, प्लॉट नं.८, गणेशनगर, रिस, पो.मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड ४१०२२२**

# तळोजा एमआयडीसीसाठी बफर झोन असावा

## कारखानदारांची राष्ट्रीय हरित लवादामध्ये याचिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसी मधील प्रदूषणाचा विषय नेहमीच गाजत आला आहे.प्रदूषणावरून राष्ट्रीय हरित लवादामध्ये यापूर्वीच याचिका दाखल झाली आहे.मात्र प्रदूषणावरून कोंडीत सापडलेल्या कारखानदारांनी देखील आपल्या हक्कासाठी राष्ट्रीय हरित लवादामध्ये याचिका दाखल केली आहे.कारखानदारांच्या तळोजा मॅनिफॅक्चरिंग असोसिएशन (टीएमए) ने एमआयडीसी परिसरात नियमाप्रमाणे बफर झोन असावा याकरिता राष्ट्रीय हरित लवादामध्ये याचिका दाखल केली आहे.

तळोजा एमआयडीसी परिसरात सिडको,पालिकेच्या परवानवीगीने असंख्य गृहप्रकल्प सुरु आहेत.शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेचे देखील प्रकल्प याठिकाणी सुरु आहेत.वाढती लोकवस्तीमुळे नागरिकांची प्रदूषणावरून ओरड वाढली आहे.त्यानुसार प्रदूषणाच्या तक्रारी वाढल्या असल्याने कारखानदार यामुळे चिंतेत आहेत.

एमआयडीसी परिसरात किमान ५०० मीटर पर्यंत कोणतेही प्रकल्प अथवा लोकवस्ती येणार नाही याबाबत भारत सरकारचाच २००१ चा आदेश आहे.या आदेशाचा दाखला देत ५०० मीटर पर्यंत बफर झोन उभारून या परिसरात लोकवस्ती अथवा कोणते प्रकल्प येणार नाहीत जेणे करून संबंधितांना त्याचा त्रास होणार नाही अशी याचिका राष्ट्रीय हरित लवादामध्ये टीएमएच्या वतीने अध्यक्ष शेखर शृंगारे यांनी दाखल केली आहे.पुढील दि.२८ रोजी या याचिकेवर सुनावणी पार पडणार आहे.विशेष म्हणजे प्रथमच कारखानदार आपल्या हक्कासाठी न्यायालयीन लढा देत असल्याचे दिसून येत आहे.एमआयडीसी सभोवताली बफर झोन असणे गरजेचे असताना सिडको आणि पालिका प्रशासनाने एमआयडीसी लगत मोठ मोठे गृहप्रकल्प उभारण्यासाठी परवानगी दिलीच कशी? हा देखील प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.तळोजा एमआयडीसी मधील प्रदूषणासंदर्भात माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी राष्ट्रीय हरित लवादामध्ये याचिका दाखल केली आहे.

या याचिकेमुळे आजवर मोठ्या संख्येने दंड कारखानदारांकडून वसुल करण्यात आला आहे.मात्र कारखानदारांनी याचिका दाखल केल्याने बफर झोन बाबत नव्याने चर्चा रंगु लागल्या आहेत.तळोजा एमआयडीसी मध्ये जवळपास ९५० कारखाने आहेत.यामध्ये ३५० रासायनिक कारखाने आहेत.असे राज्यातील सर्वात मोठ्या एमआयडीसी मधील हि एक एमआयडीसी आहे.त्यामुळे शासनाला देखील मोठ्या प्रमाणात उत्पन्न याठिकाणाहून कराच्या रूपाने मिळत आहे.असे असताना काही घटक एमआयडीसीला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप कारखानदार करीत आहेत.

एमआयडीसी परिवारात पाचशे मीटरपर्यंत बफर झोन असावे हि कारखानदारांची मागणी रास्त आहे.भविष्यात दुर्दवी घटना घडल्यास रहिवाशांना त्रास नको म्हणुन बफर झोनची संकल्पना आखली गेली आहे.मात्र तळोजा एमआयडीसी ला लागूनच शेकडो गृहप्रकल्प सुरु आहेत.

असंख्य जणांनी याठिकाणी घरे बुक केली असताना बफर झोन बाबत न्यालयात वाद सुरु असताना या परिसरात सुरु असलेल्या बंधकांचे काय ?असाही प्रश्न निर्माण झाला आहे.

## संक्षिप्त...

### रोहा रेल्वे स्थानकावर शुक्रवारी मेगा ब्लॉक

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा रेल्वे स्थानकावर उद्या शुक्रवार दि. १८ नोव्हें. ला रेल्वे मार्ग दुरुस्ती, अभियांत्रिकी कामासाठी मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे सकाळी ११ वाजता येणारी गाडी नंबर ०१३४७ दिवा – रोहा ही गाडी रोहा पर्यंत न येता नागोठणे पर्यंतच येईल. तिथूनच ती गाडी नंबर ०१३४८ नागोठणे ते दिवा अशी तिच्या नियोजित वेळेनुसार सुटेल. यामुळे रोहा स्थानकावरील प्रवाश्यांनी होणारी गैरसोय लक्षात घेत सायंकाळी ५ वाजून १५ मिनिटांनी येणारी सावंतवाडी – दिवा गाडी नंबर १०१०६ या गाडीची तिकिटे रोहा स्थानकात पुढील प्रवासाची मिळतील व ही गाडी पनवेल पर्यंत सर्व स्थानकांवर थांबेल. शनिवार दि. १९ नोव्हें पासून रोहा स्थानकावरील सर्व गाड्या नियोजित वेळापत्रकानुसार धावतील अशी माहिती रोहा रेल्वे स्थानक प्रबंधक सुरेश कुशवाहा यांनी दिली असून प्रवाशांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

### गरजूंना ब्लँकेटचे वाटप


**दै.रायगड नगरी । पनवेल**

कै. नारायण लक्ष्मण तांबोळी यांच्या स्मृतिदिनानिमित्त उपेक्षित घटकांना मदत व्हावी या हेतूने पनवेल परिसरात ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात नुकतीच थंडीला सुरुवात झाली आहे. सध्या थंडीचे दिवस असून सर्वसामान्य व्यक्ती आपली थंडी उबदार कपडे घालून कमी करू शकतो. मात्र जे वंचित आहेत, गोरगरीब आहेत त्यांना पोटाचे खळगी भरतानाच अडचण येते. अशा वंचितांना आधार देण्यासाठी व त्यांची थंडी काही अंशी कमी करण्याचा प्रयत्न नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था यांच्या वतीने हर्षला योगेश तांबोळी व सीमा नारायण तांबोळी यांनी करण्याचा प्रयत्न केला आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## खारघर टोल नाक्यावरील बंद फास्ट टॅग तात्काळ सुरू करा : मनसेची मागणी



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

सायन पनवेल महामार्गावर असलेल्या खारघर टोल नाक्यावर बंद असलेली फास्ट टॅग सुविधेमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असेल फास्ट टॅग कार्यनवीत नसल्याने बऱ्याच वेळेला रोख रक्कमेवरुन वाद निर्माण होत असल्याच्या अनुषंघाने महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेकडून ही फास्ट टॅग सुविधा तात्काळ सुरु करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

नवनिर्माण नवनिर्माण वाहतूक सेनेचे मावळ लोकसभा उपाध्यक्ष भगवान खताळ यांनी या प्रश्नाबाबत आवाज उठवला असून तात्काळ ही फास्टॅ टॅग सेवा सुरु करा अन्यथा मनसे पद्धतीत आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

सायन पनवेल टोल व्यवस्थापक यांना देण्यात आलेल्या निवेदनावेळी पनवेल विधानसभा चिटणीस सचिन जाधव, गिरीश तिवारी, कळंबोली शहर संघटक अतुल जाधव उपस्थित होते.

## पथनाट्यातून म्हसळा नगरपंचायतीची स्वच्छतेसाठी जनजागृती

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

स्वच्छ आणि सुंदर म्हसळा या उपक्रमांतर्गत म्हसळा नगरपंचायत विविध उपक्रम राबवित आहे. सध्या राज्यात म्हसळा नगरपंचायतीचा ३२ वा क्रमांक असून येत्या काही महिन्यात प्रथम दहा क्रमांकात येण्याचा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांचा मानस असून सातत्याने नगरपंचायतिकडून विविध उपक्रम राबविले जातात. या साठी नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक आणी प्रशासन यांचे फार मोठे सहकार्य लाभत असल्याचे मनोज उकिर्डे यांनी सांगितले.



माय नॉलेज संस्था उरण यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायतीच्या वार्डा नुसार प्रत्येक वार्डात, शाळा–शाळातून पथनाट्याद्वारे स्वच्छता आणी प्लास्टिक बंदी याविषयी प्रभोधन देऊन जनजागृती करण्यात आली. वार्ड क्र.१३ मध्ये कुंभारआळीतील सर्व नागरिकांना याबाबत प्रबोधन करण्यात आले. यासाठी नगरसेविका सौ. राखी अजय करंबे यांनी सहभाग घेऊन जास्तीत जास्त नागरिकांना स्वछता आणी प्लास्टिक मुक्ती बाबत प्रबोधन देण्यात आले. याप्रसंगी स्वच्छता समन्वयक श्रीम. चव्हाण, तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, सुशील यादव, अजय करंबे, विशाल सायकर, नंदू गोविलकर, अनुबाई म्हशीलकर, संतोष कुडेकर, सौ. कुमुद कुडेकर, राहुल जैन, धोंडिबाई बिरवाडकर, हेमंत नात्ती आदि मान्यवर उपस्थित होते.

## बळजबरीने डांबून ठेवल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालघर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे पक्षाच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारास मतदान करावे यासाठी बाळासाहेबांची शिवसेना या पक्षातील मंगेश भोईर यांना दमदाटी करून मतदान केल्यास पाच लाख रुपये देऊन असे आमिष दाखवले व त्यांना बळजबरीने डांबून ठेवले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चार आरोपीं विरोधात ट्रॉसिटी व विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पास्थळ, जिल्हा पालघर येथील मंगेश दयानंद भोईर हे २०१९ ला शिवसेना पक्षातर्फे जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले. तीन महिन्यांपूर्वी त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला. पालघर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाला महिला राखीव अध्यक्षपदाचा अडीच वर्ष कालावधी संपुष्टात आल्याने पुन्हा अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया १६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. यावेळी या निवडणुकीत उद्धव ठाकरे पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवाराला मतदान करावे यासाठी धाकटी डहाणू जिल्हा परिषद गटाचे सदस्य जयेंद्र किसन दुबळा, मोज जिल्हा परिषद गटाचे सदस्य अरुण ठाकरे, अमेय विकास पाटील, व पालघर जिल्हाप्रमुख पंकज देशमुख हे दबाव आणत होते. ८ नोव्हेंबर रोजी पंकज देशमुख व दोन अनोळखी इस्मानी भोईर यांना गाडीत बसायला लावले व त्यांचा मोबाईल हिसकावून बंद केला. त्यानंतर विरार येथील उद्धव ठाकरे पक्षाच्या कार्यालयामध्ये त्यांनी नेले. व चार –पाच तास कुठेही जाऊ दिले नाही. व सतत त्यांच्या पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी आमिष व धाक दाखवला. त्या ठिकाणी अरुण ठाकरे, जयेंद्र दुबळा व अमेय पाटील आले. त्यांनी सुद्धा दमदाटी करून मतदान केल्यास पाच लाख रुपये देण्याचे आमिष भोईर याना दाखवले. या गोष्टीला नकार दिला असता त्यांनी पुन्हा त्याच गाडीमध्ये बसवून वरळी मुंबई, हिल व्हिलेज हॉटेल या ठिकाणी रात्री नेले.

त्या ठिकाणी सहा अनोळखी ईसम व त्यांच्यासोबत या चारही इसमानी त्यांना दमदाटी केली. व दोन दिवस ठेवून मानसिक तणाव दिला. दहा नोव्हेंबर रोजी त्यांची नजर चुकवून भोईर पळाले व टॅक्सी पकडून मुंबई विरार लोकलने विरारला आले. त्यानंतर एका इसमाच्या मोबाईल वरून त्यांनी रविंद्र फाटक यांना घडलेला प्रकार सांगितला व ते पास्थळ, पालघर येथे सुखरूप पोहोचले. सर्व इसम पुन्हा भोईर यांना गाठतील व किडनॅप करतील या भीतीने ते पनवेल येथील एका हॉटेलमध्ये आले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात जयेंद्र किसन दुबळा , अरुण ठाकरे, अमेय विकास पाटील, पंकज देशमुख यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बिबट्या दिसल्याने परिसरात भीतीचे वातावरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोरबे परिसरात नागरिकांना बिबट्या दिसल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

पनवेल तालुक्यातील मोरबे, कोंडले, महालुंगी गावाच्या आसपास नागरिकांना बिबट्या दिसला. हा बिबट्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या बिबट्या ची माहिती वनविभागाला दिल्यानंतर वनविभागाने यासंदर्भात परिसराची पाहणी केली. एन के आयुर्वेदिक व्हिलेज परिसरात हा बिबट्या दिसून आला. त्याच्या पायाचे ठसे देखील उमटले आहेत. वावंजे परिसरात दिसलेला बिबट्या मोरबे परिसरात आला असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील ओबीसी बांधव आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार ; ओबीसींच्या जनगणनेसह अनेक मागण्यांसाठी मोर्चा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

देशात सन १९३१ नंतर ओबीसींची जनगणना सरकारने केलेली नाही. त्यामुळेच अठरापगड जातींचा समावेश असूनही ओबीसी समाज शासनाच्या अनेक सोयी–सुविधांपासून आजही वंचित राहिलेला आहे. ओबीसी समाजाची जनगणना होण्यासाठी देशात सर्वत्र लढा उभारण्यात येत आहे. याचबरोबर महाराष्ट्र ओबीसी संघर्ष समिती अंतर्गत असलेल्या रायगड जिल्हा ओबीसी संघर्ष समन्वय समितीनेही १८ नोव्हेंबरला अलिबाग येथे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन केले आहे. त्यामुळेच रायगड जिल्ह्यातील ओबीसी बांधव आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठ्या संख्येने धडकणार आहेत.

जनमोर्चा साठी अधिकाधिक ओबीसी समाज बांधवांनी एकत्रितपणे येऊन लढा दिले पाहिजे या आवाहनाला जिल्ह्यातील तालुका व विभाग स्तरावर गठित करण्यात आलेल्या ओबीसी संघटनेचे तालुका, विभागीय अध्यक्ष व विविध समाजाचे नेतेमंडळी यांनी प्रतिसाद देत आपला पाठींबा दर्शविला आहे. कुणबी, आगरी, कोळी, तेली, सुतार,नाभिक, कुंभार, जंगम, माळी, परीट, धनगर, गोसावीसह सर्व उपस्थित ओबीसी समाजांनी सदरच्या मोर्चाला पाठींबा दर्शवित सहभागी होण्याचे आश्वासन दिले आहे.

राज्यासह देशभरात ओबीसीचे संख्याबल अधिक आहे त्यामुळे ओबीसीला त्यानुसारच आरक्षण दिले गेले पाहिजे सन १९३१ नंतर संपूर्ण देशात ओबीसींची जनगणना सरकारने केली नाही त्यामुळे काहीसा हा ओबीसी समाज व त्याला शासनाच्या मिळणाऱ्या सोयी सुविधा या पासून वचिंत राहिला आहे गेली अनेक वर्षे देशातील राजकीयदृष्ट्या पाहिले तर देशात बहुसंख्येने असलेला ओबीसी समाज हा मागासलेला आहे आर्थिक बळ नाही निवडणुकीत त्याला पुरेसा आरक्षण नसल्याने त्याची पिछेहाट होत आहे.

त्यामुळे येत्या कालावधीत रायगड जिल्ह्यातील सर्व ओबीसी समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी समाजाच्या संघाटनात्मक वाढीवर भर देत त्यांना बळ देऊन समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात लढा उभारला जाणार असल्याने अलिबाग येथील रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावरील या मोर्चात लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा ओबीसी संघर्ष समन्वय समिती व ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष सुरेश मगर यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तळोजा मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील जोमा हरी पाटील व इतर यांचे मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन मिळकत आम्ही कायम स्वरुपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजे मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ९८ | ३ | एकूण क्षेत्र ०–१७–७० | १.३७ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.१७/११/२०२२
पनवेल

सही/–
**ॲड.प्रविण दत्तू पाटील**
**हरिओम नगर फ्लॅट नंबर बी–२,**
**तळमजला, कफ नगर ठाणा नाका जुने**
**पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**मो.नं.९९२०९९५९९६**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत श्री.वामन शिवराम पाटील वगैरे इतर १०, यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.वामन शिवराम पाटील वगैरे इतर १० | ९/२ | ०–४८–७० यापैकी विक्री क्षेत्र ०–२४–३५ | ८–५० |

मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.वामन शिवराम पाटील वगैरे इतर १० यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१८/११/२०२२

सही/–
**ॲड.मयुरेश प्र.हनुमंते**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर**
**कृपा बिल्डींग, ठाणा नाका**
**रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**



अर्जदारातर्फे वकील
ॲड.सुवर्णा ल. चंदन
ॲड.रसिक वि. कोठेकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६४४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२३

सैफुद्दीन कादरभाई भारमल — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, कै. ताहेरभाई उर्फ ताहेर कादरभाई भारमल, हे दि.०४/०४/२०१९ रोजी मयत पावले असून त्यांना अर्जदार सैफुद्दीन कादरभाई भारमल असे वारस आहेत. अर्जदार हा त्यांचा सख्खा भाऊ अहे, सबब अर्जदार हेच कै.ताहेरभाई उर्फ ताहेर कादरभाई भारमल यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.ताहेरभाई उर्फ ताहेर कादरभाई भारमल यांचे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

**निवासी सदनिका नं.२८०२, माळा नं.२८ मजला, इमारतीचे नाव : एस २, बी विंग, ॲटलास, ब्लॉक नं.मॅरेथॉन नेक्सझोन–ॲटलास, पळस्पे फाट्याजवळ, रोड नं.एन.एच.४ बी, कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मिळकतीच्या सदनिका क्षेत्राची माहिती : ६१.७८ चौ.मी. कारपेट व बाल्कनी क्षेत्र : ९.८६ चौ.मी. कारपेट (रेरा प्रमाणे), बंदिस्त वाहन तळाचे क्षेत्र : ११.१५ चौ.मी.**

अर्जदार यांनी कै.ताहेरभाई उर्फ ताहेर कादरभाई भारमल यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यसंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१७/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गुन्नाल साहेब
वकील : सुयोग शहाजी मोलाने

### जाहीर नोटीस

वारसाच्या सर्टीफिकेट बद्दल पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) पनवेल यांच्या न्यायालयात
अर्ज क्र.१५६५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२३

१) श्रीमती.कांचन हरिश्चंद्र शुक्ला व इतर २
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) महिमा हरिश्चंद्र शुक्ला
वय : २७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) चंद्रधर हरिश्चंद्र शुक्ला
वय : २३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : रुम नं.१०४, पहिला मजला,
बी विंग, वास्तू शांती अपार्टमेंट,
सेक्टर नं.११, प्लॉट नं.१३, कळंबोली,
तालुका : पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२१८ — अर्जदार

ज्यापेक्षा अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ यांचे पती तसेच अर्जदार क्रं.२ व ३ यांचे वडील कै.हरिश्चंद्र शुक्ला रामापती यांचे दि.११/०९/२०२१ रोजी राहत्या घरी रुम नं.१०४, पहिला मजला, बी विंग, वास्तुशांती अपार्टमेंट, सेक्टर नं.११, प्लॉट नं.१३, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र–४१०२१८ येथे निधन झाले. अर्जदार यांनी कोर्टास सदरहू मयताचे वारसदार म्हणून अर्ज केला आहे. त्याच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**अ) रुम नं.१०४, पहिला मजला, बी विंग, वास्तुशांती अपार्टमेंट, सेक्टर नं.११, प्लॉट नं.१३, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र–४१०२१८, क्षेत्रफळ ४१.४५ चौ.मी. (बिल्टअप क्षेत्रफळ ३.२५ चौ.मी.)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/११/२०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**